**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १५३ वा ● रविवार २२ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 153 | Date : 22/10/2023 | blow :sunday Page 4 Price 4

# गगनयान मोहिमेचं पहिलं पाऊल! उड्डाण चाचणी यशस्वी



## चाचणीनंतर बंगालच्या खाडीतून क्रू मॉड्यूल सापडलं

नवी दिल्ली : भारतीय अंतराळ संशोधन संस्था पहिल्या मानवी मोहिमेसाठी सज्ज आहे. इस्त्रो च्या गगनयान मोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पार पडला आहे. इस्त्रोच्या गगनयान मोहिमेची पहिली उड्डाण चाचणी शनिवारी, २१ ऑक्टोबर रोजी यशस्वीपणे पार पडली आहे. चाचणीनंतर गगनयान मोहिमेचं क्रू मॉड्यूल बंगालच्या उपसागरात सापडलं आहे. क्रू मॉड्यूल सापडल्यानंतर ते चेन्नई बंदरात आणण्यात आलं आहे.

इस्त्रोच्या महत्त्वाकांक्षी पहिल्या मानवी मोहिमेतील अबॉर्ट मिशन-१ (TV-D1) चं प्रक्षेपण (ISRO Gaganyaan Crew Module -bort Test) २१ ऑक्टोबरला करण्यात आलं. इस्त्रो प्रमुखांनी याबाबत अधिकृत माहिती दिली आहे. इस्त्रोचे प्रमुख सोमनाथ यांनी सांगितलं की, गगनयानचं क्रू मॉड्युल बंगालच्या उपसागरातून ताब्यात घेण्यात आलं आहे. पहिलं चाचणी उड्डाण यशस्वी झाल्यानंतर क्रू मॉड्यूलला कोणतंही नुकसान झालेलं नाही. क्रू मॉड्यूलचा सर्व डेटा ठीक आहे. गगनयानची पहिली उड्डाण चाचणी क्रू एस्केप सिस्टमसाठी होती आणि ती साध्य झाली आहे.

वृत्तसंस्था ANI च्या वृत्तानुसार, इस्त्रो (ISRO) ने आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटर (Satish Dhawan Space Centre) येथून गगनयान मिशनमध्ये टेस्ट व्हेईकल डेव्हलपमेंट फ्लाइट १ (TV-D1) चं पहिलं चाचणी उड्डाण प्रक्षेपित केलं. शनिवारी, २१ ऑक्टोबरला सकाळी ८:४५ वाजता लाँचिंग होणार होतं, पण इंजिनच्या | **पान २ वर**

# तेज चक्रीवादळाचं संकट! पुढील २४ तासांत विक्राळ रुप धारण करणार; IMD कडून अलर्ट जारी

मुंबई : अरबी समुद्र मध्ये 'तेज' चक्रीवादळ तयार झालं असून पुढील २४ तासांत हे चक्रीवादळ आक्राळ-विक्राळ रूप धारण करू शकतं. पुढील २४ तासांत त्याचे आणखी खोल दाबात रुपांतर होण्याची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागाने जारी केला आहे. हवामान विभागाने या चक्रीवादळाचं वर्णन अतिशय तीव्र चक्रीवादळ असं केलं आहे. हवामान खात्याने यापूर्वी माहिती देताना सांगितलं होतं की, तेज चक्रीवादळ २१ ऑक्टोबर रोजी रात्री ११.३० वाजता तीव्र होईल. आता हे वादळ २२ ऑक्टोबरच्या दुपारच्या सुमारास अतिशय तीव्र चक्री वादळात रूपांतरित होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. या चक्रीवादळाचा वेग आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अरबी समुद्रात चक्रीवादळ निर्माण झालं असून या चक्रीवादळाला 'तेज' असं नाव देण्यात आलं आहे. हे चक्रीवादळ अरबी समुद्रातील



यंदाच्या वर्षातील दुसरं चक्रीवादळ आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचं क्षेत्र तयार होऊन त्याचं चक्रीवादळात रुपांतर झालं आहे. हवामान विभाग च्या मते, तेज चक्रीवादळाचं रविवारी तीव्र चक्रीवादळात रुपांतर होऊन ओमान आणि शेजारील येमेनच्या दक्षिण किनार्याकडे सरकण्याचा अंदाज आहे.

आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री ११.३० वाजण्यापूर्वी सोकोत्रा (येमेन) च्या ९०० किमी पूर्व-आग्नेय, | **पान २ वर**

# पुणे शहरातील वाहतुक सुविधा आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य

पुणे :उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे महानगरपालिका क्षेत्रात सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मुदतीत मिळकत कर भरलेल्या नागरिकांसाठी राबविलेल्या लॉटरी योजनेमधील विजेत्या मिळकतधारकांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. पुणे शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी वर्तुळाकार महामार्गाचे काम लवकर सुरू व्हावे आणि मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील कामे गतीने पूर्ण करण्याला प्राधान्य देण्यात येत आहे,



असे प्रतिपादन यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी केले.

सीओईपी विद्यापीठ मैदानावर आयोजित या कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त कुणाल खेमनार, विकास ढाकणे, उपायुक्त अजित देशमुख आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, शहराचा विकास करण्यासोबत शहर सुंदर आणि हिरवेगार रहावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. शहराचा नियोजनबद्ध विकास करून नागरिकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा पहिला टप्पा ९ किलोमीटर क्षेत्रात सुरू करण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना नदीच्या दोन्ही तटावर फिरण्यासाठी चांगली सुविधा मिळणार आहे. या परिसरात झाडे लावण्यात येणार आहेत. पुढील ५० वर्षाचा विचार करून विकासकामे करण्यात येत आहेत.कचरा संकलनासाठी पर्यावरणपूरक विद्युत वाहने घेण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठीदेखील विद्युत बसेस घेण्यात आल्या आहेत. शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषण मुक्त करण्याच्या या प्रयत्नांना नागरिकांनीही प्रतिसाद द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

मुदतीत मिळकतकर भरलेल्या नागरिकांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले की, नागरिकांनी | **पान २ वर**

# दिवाळीकरिता 'आनंदाचा शिधा' राज्यात बुधवारपासून मिळणार

मुंबई : सर्वसामान्य व गरीब जनतेचा सणांचा गोडवा आणखी वाढावा, यासाठी राज्य शासनाकडून देण्यात येणारा 'आनंदाचा शिधा' बुधवार २५ ऑक्टोबरपासून मिळणार आहे, अशी माहिती शनिवारी राज्य सरकारने दिली. मागील महिन्यात गौरीगणपती काळात लाभार्थ्यांना 'आनंदाचा शिधा' किटमध्ये शंभर रुपयांत साखर, तेल, रवा व हरभरा डाळ प्रत्येकी एक किलोप्रमाणे देण्यात आली होती. आता दिवाळीसाठी 'आनंदाचा शिधा'त पोहे व मैदा या दोन वस्तूंचा समावेश केला आहे. राज्यात या योजनेअंतर्गत १ कोटी ५८ लाख ३३ हजार ७१८ रेशन कार्डधारकांना लाभ मिळेल. कार्डधारकांना देण्यात येणाऱ्या या संचातील वस्तूंच्या दर्जाबाबत दक्षता घ्या, अशा सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. मैदा आणि रवा या वस्तूंची खाण्यायोग्य मुदत संपण्यास किमान तीन महिन्यांपेक्षा अधिक, तर अन्य चार पदार्थांसाठी चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधी राहणार नाही, याचीही खात्री करण्याची सूचना दिली आहे.

# हा हिंदूच देश, हिंदुनीच मुस्लिमांचा सांभाळ केलाय, हे केवळ भारतच करू शकतो

नवी दिल्ली : देशात सर्व धर्म आणि पंथांचा आदर करणारा एक धर्म आहे, हा हिंदूंचा देश आहे, सर्वांची काळजी घेणार्यालाच हिंदू असं म्हणतात आणि हे फक्त हिंदुस्थानच करतो, असं मत सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाला तीनशे पन्नास वर्ष झाल्याच्या निमित्तानं आयोजित एका व्याख्यानात बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी हे वक्तव्य केलं होतं. प्रतापनगर शिक्षण संस्थेनं हे व्याख्यान आयोजित केलं होतं.



जगात बाकी सगळीकडे मारामारी होत आहे, तुम्ही वर्तमानपत्र वाचत असाल, युक्रेन युद्धाबद्दल तुम्ही ऐकलंच असेल. हमास आणि इस्रायलमध्येही युद्ध होत आहे. मात्र, आपल्या देशात अशा मुद्द्यावर कधीही भांडण झालेलं नाही. आम्ही या मुद्द्यावर कधीही लढलो नाही, अशा मुद्द्यांवर आम्ही कोणाशीही भांडत नाही, याचं कारण आपण हिंदू आहोत, असं आहे आणि हा हिंदूंचा देश आहे, असं मोहन भागवत म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच जीवनाचं आपण अनुकरण करावं असंच आहे. त्यांचं अनुकरण म्हणजे, घोड्यावर बसण्या एवढं सोपं नाही, त्यांनी ज्या गुणांचा आधारावर कर्तृत्व गाजवलं ते गुण कुठल्याही काळात महत्वाचे | **पान २ वर**




# सोलापूर येथील नेहरू युवा केंद्र बनले तळीरामाचा अड्डा

## संपूर्ण जिल्ह्यात व्यसनमुक्ती चळवळ उभे करणारे नेहरू युवा केंद्रात दारूच्या बाटल्या


सोलापूर/प्रतिनिधीः नेहरू युवा केंद्राच्या सोलापूर कार्यालयात पाहणी केली असता भरलेल्या दारूच्या बाटल्या आणि दारूचे ग्लास सापडले, सरकारी कार्यालयात दारूच्या बॉटल सापडणे अत्यंत गंभीर आहे, ऑन ड्युटी अधिकारी आणि कर्मचारी कार्यालयात दारू ठेवत असतील आणि ऑन ड्युटी दारू पीत असतील तर नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार आणि मल्टी टास्क ऑफिसर सुभाष चव्हाण यांना सेवेतून तत्काळ बडतर्फ केले पाहिजे. स्वतः सुभाष चव्हाण ऑफिसमध्ये दररोज दारू पीत असल्याची माहिती जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार यांनी आम्हाला दिली आहे.



याबाबत जिल्हाधिकारी श्री. कुमार आशीर्वाद यांच्याकडे कठोर कारवाई करण्याची मागणी विकास वाघमारे यांनी केली आहे.

नेहरू युवा केंद्राच्या वतीने युवकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असतो खेळा सोबत स्वयंरोजगार प्रशिक्षण, व्यसमुक्ती कार्य ही नेहरू युवा केंद्राच्या वतीने घेण्यात येत असतो मात्र याच ठिकाणी दारूचा अडा बनवले असेल तर दुर्देवी आहे याठिकाणी अनेक कार्यक्रम बोगस दाखवून बिले उचलण्यात येत असून त्याच्या मास्टरमन चव्हाण असल्याचा अनेक संस्थेचे संचालक , अध्यक्ष बोलत आहेत

त्या ठिकाणी संस्थेने कुठल्याही योजनेसाठी प्रस्ताव दिल्यास चव्हाण हा आर्थिक व्यवहार केल्याशिवाय मंजूर करतच नसल्याचे कळतो या सर्व बाबीकडे जिल्हाधिकारी यांनी त्वरित लक्ष घालून संबंधित जिल्हा समन्वयक अजित कुमार व चव्हाण यांना त्वरित निलंबित करून खात्यानिहाय चौकशी करून कडक कार्यवाही करण्याची मागणी जिल्ह्यातील अनेक संस्थेने व युवकांनी करत आहे.



नेहरू युवा केंद्राच्या सोलापूर जिल्हा कार्यालयात दारूच्या बाटल्या आणि अन्य सामुग्री सापडली. विकास वाघमारे यांनी ही धाड टाकली. त्यांचे अभिनंदन. मी गेल्या काही वर्षांपासून या कार्यालयातर्फे ग्रामीण भागात आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होत आलो आहे पण या कार्यालयात हा प्रकार अलीकडे सुरू झालेला असावा.

जवळपास दोन वर्षांत फारसा संबंध नाही. धाड पाहून विलक्षण खेद वाटला. या कार्यालयाच्या प्रमुखाचा पगार उपजिल्हाधिकाऱ्यापेक्षा जास्त असतो. केंद्र सरकारचे असे आणखी एक कार्यालय आहे. ते म्हणजे क्षेत्रीय प्रचार कार्यालय. या दोन्ही कार्यालयांचे कर्मचारी कधी संपर्कात आले तर आपल्याला कसे काहीच काम नसते हे सांगत असतात. एकेका कार्यालयात कर्मचाऱ्यांचा पगार धरून १५ ते २० लाख रुपये खर्च केला जातो. पण महिन्यात फारतर एक दोन कार्यक्रम असतात. **-अरविंद जोशी,जेष्ठ पत्रकार,**

# खासदार शरद पवार पंढरपूर दौऱ्यावर

## महाराष्ट्रातील महाविकास आघाडीची पहिली बैठक पंढरपूरात

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष, खासदार श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, माजी मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे, शिवसेना तसेच शेकाप पक्ष, मित्र पक्षांसोबत जिल्हातील अनेक नेते यांच्या उपस्थितीत श्रीयश पॅलेस, पंढरपूर येथे दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ रोजी १२वा. महाविकास आघाडीची महाराष्ट्रातील पहिली बैठक संपन्न होणार आहे..

सदर दौऱ्यात सकाळी १०:०० वाजता कापसेवाडी, ता.माढा येथे द्राक्ष बागायतदार मेळाव्यास श्री.शरद पवार साहेब मार्गदर्शन करतील नतंर हेलिकॉप्टरने १२ वाजता पंढरपूर श्रीयश पॅलेस माहविकास आघाडी बैठक होईल. १:३० वाजता पंढरपूरचे नगरसेवक आदित्य फत्तेपुरकर यांच्या घरी भोजन, दुपारी २ वाजता श्रीक्षेत्र पंढरपूर मंदिरात पांडुरंगाचे दर्शन, २:३० वाजता ट्युलिप हॉस्पिटल लोकार्पण व ३:३० वाजता हेलिकॉप्टरने परत पुण्याला रवाना असे कार्यक्रमांचे नियोजन असल्याचे राष्ट्रवादीचे नेते, श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी माहिती दिली.. मध्यंतरीच्या



काळात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील अनेक आमदार व नेत्यांनी पक्ष सोडला. त्या काळात सोलापूर, पंढरपूर जिल्ह्यातून श्री.अभिजीत पाटील यांनी शदर पवार साहेबांना भक्कम पाठिंबा दर्शविला आहे. श्री.अभिजीत पाटील यांच्या नियोजनाखाली ही बैठक संपन्न होणार आहे. सोलापूर तसेच पंढरपूर, मंगळवेढा कार्यकर्त्यांना शरद पवार काय मंत्र देणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. दि.२१ ते २६ ऑक्टोबर २०२३ दरम्यान श्री.शरदचंद्रजी पवार यांचा महाराष्ट्रात विविध ठिकाणी दौरा संपन्न होणार आहे. त्यात दि.२३ ऑक्टोबर रोजी होणारी महाराष्ट्रातील महाविकास आघाडीची पहिली बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची सर्वत्र चर्चा आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### अशी अपेक्षा...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनी दिल्लीतील लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणादरम्यान एका महत्त्वाच्या योजनेचे संकेत दिले होते. ही योजना म्हणजे नवे घर खरेदी करणाऱ्या शहरी गरीब, अल्प आणि मध्यमवर्गियांना गृहकर्जाच्या व्याजदरात सवलत देण्याची. सध्या या योजनेची मालमत्ता बाजारपेठेत मोठी चर्चा सुरू आहे. कारण अशी योजना लागू झाल्यास त्याचा मालमत्ता बाजारपेठेला मोठा बूस्ट मिळू शकतो. नॅशनल रियल इस्टेट डेव्हलपमेंट काउन्सिल (नरेडको) या बांधकाम व्यावसायिकांच्या संस्थेने नुकतीच आपल्या गव्हर्निंग काउन्सिलच्या बैठकीत हरिबाबू यांची अध्यक्षपदी निवड केली. हरिबाबू हे आंध्र प्रदेश रियल इस्टेट डेव्हलपमेंट असोसिएशनचे अध्यक्षदेखील आहेत. हरिबाबू यांनी केंद्र सरकारकडे मागणी केली की, केंद्राने ४५ लाख रुपये किमतीपर्यंतचे घर खरेदी करण्यास इच्छुक ग्राहकांना गृहकर्जावरील व्याजावर अनुदान द्यावे. ॲनारॉक या मालमत्ता बाजारपेठेचे सर्वेक्षण करणाऱ्या संस्थेने नुकताच एक अहवाल जारी केला होता. यात जुलै ते सप्टेंबर २०२३ या तिमाहीत देशाच्या सात प्रमुख शहरांमध्ये स्वस्त किंवा परवडणाऱ्या घरांचा वाटा १८ टक्क्यांपर्यंत घसरल्याचे नमूद केले आहे. या तुलनेत २०१८ मध्ये परवडणाऱ्या घरांचा वाटा हा ४२ टक्के इतका होता. परवडणाऱ्या घराची व्याख्या ही शहर-ग्रामीण भाग आणि मुख्यत्वेकरून ग्राहकांच्या उत्पन्नाशी निगडित आहे. तरी महामुंबई (मुंबई मेट्रोपोलिटन रिजन) सारख्या शहरी क्षेत्राचा विचार करायचा झाल्यास इथल्या घरांच्या किमती कोटी कोटीची उड्डाणे घेताना दिसतात. त्यामुळेच बांधकाम व्यावसायिक ४० लाख किंवा त्यापेक्षा कमी किमतीची घरे बांधण्यात स्वारस्य दाखवत नसल्याचे ॲनारॉकने आपल्या अहवालात नमूद केले आहे. परिणामी शहरी गरीब, निम्न मध्यमवर्गियांना नवीन घर घ्यायचे असल्यास शहराबाहेर पडण्यावाचून कुठलाही पर्याय उरलेला नाही. त्याच पार्श्वभूमीवर केंद्रातील मोदी सरकार शहरी गरीब आणि मध्यमवर्गासाठी नवीन गृहकर्ज अनुदान योजना सुरू करण्याच्या विचारात असल्याचे म्हटले जात आहे. या योजनेची तारीख अद्याप निश्चित करण्यात आलेली नसली, तरी मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेवर चर्चा झाल्याचे समजत आहे. शहरी अल्प आणि मध्यम वर्गाची ही अस्वस्थता लक्षात घेऊन केंद्र सरकार या योजनेवर गांभीर्याने विचार करत आहे. ही योजना लागू झाल्यास आणखी हजारो लाभार्थ्यांची स्वप्नपूर्ती होऊ शकते. त्यामुळे निवडणुकीच्या नफ्या तोट्याचा विचार न करता केंद्राने ही योजना तत्काळ लागू करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

### गगनयान मोहिमेचं ..

इग्निशनमध्ये समस्या निर्माण झाल्याने या चाचणीला उशीर झाला आणि सकाळी १० वाजता प्रक्षेपण करण्यात आलं.

गगनयान मोहिमेची अबॉर्ट टेस्ट म्हणजे क्रू एस्केप सिस्टमची चाचणी. अबॉर्ट टेस्ट ही अंतराळवीरांच्या सुरक्षेसाठीची येणारी चाचणी आहे. गगनयान मोहिमेदरम्यान तांत्रिक बिघाड किंवा अडचण निर्माण झाल्यास अंतराळवीरांची सुरक्षितपणे सुटका व्हावी आणि त्यांना सुरक्षित पृथ्वीवर आणण्यासाठीच्या प्रणालीची ही चाचणी आहे. गगनयान अबॉर्ट टेस्टमध्ये गगनयानचं क्रू मॉड्यूलचं लाँच व्हेईकलद्वारे प्रक्षेपण करण्यात आलं. क्रू मॉड्यूलने अवकाशात भरारी घेऊन त्यानंतर ठराविक उंची गाठल्यानंतर क्रू मॉड्यूल रॉकेटपासून वेगळं झालं आणि समुद्रात लँड झालं. बंगालच्या उपसागरात क्रू मॉड्यूलने टचडाउन केल्यानंतर, भारतीय नौदलाच्या जहाजाने क्रू मॉड्यूल पुन्हा ताब्यात घेतलं.

### तेज चक्रीवादळाचं संकट!

सलालाह विमानतळाच्या (ओमान) १,१७० किमी आग्नेय आणि अल घायदाह (येमेन) पासून १,२६० किमी पूर्वेस कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. सध्या तेज चक्रीवादळ यमनच्या साकोत्रा किनाऱ्यापासून ५५० किलोमीटर पूर्व-दक्षिण पूर्वेकडे आहे. स्कायमेट वेदर या खाजगी हवामान संस्थेच्या अंदाजानुसार, बहुतेक मॉडेल्स सूचित करतात की, वादळ येमेन-ओमान किनारपट्टीच्या दिशेने पुढे सरकत आहे.चक्रीवादळामुळे दक्षिणपूर्व आणि पूर्व मध्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र विकसित झालं आहं. यामुळे भारतीय तटरक्षक दलाने आंध्र आणि तामिळनाडू किनारपट्टीवर काम करणाऱ्या मच्छीमारांना बंदरावर परत जाण्याचा सल्ला दिला आहे. भारतीय तटरक्षक दलाने चेन्नई, आंध्र आणि तामिळनाडू किनारपट्टी भागत अनेक जहाजे तैनात केली आहेत. तसेच मच्छीमारांना समुद्रात जाण्यास मनाई करण्यात आली आहे. तेज चक्रीवादळाचा गुजरात किनारपट्टीला सध्या कोणताही धोका नसल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे. हवामान विभागाने चक्रीवादळ तेजबाबत संदर्भात धोक्याचा इशारा जारी केला आहे. मच्छिमारांना २५ ऑक्टोबरपर्यंत दक्षिण-पश्चिम अरबी समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पश्चिम-मध्य अरबी समुद्रात सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून मच्छिमारांना २५ ऑक्टोबरच्या रात्रीपर्यंत या भागात जाऊ नये, असं आवाहन करण्यात आलं आहे. सध्या समुद्रात असलेल्या लोकांना तात्काळ किनारपट्टीवर परतण्यास सांगण्यात आलं आहे.

## आरसेटी संस्थेतून महिलांना रोजगाराचे प्रशिक्षण

एक स्त्री खूप चांगली व्यवस्थापक असते. एका वेळी ती अनेक गोष्टींचे व्यवस्थापन करत असते. ज्यांना स्वावलंबी व्हायची आस आहे, त्यांच्यासाठी आर सेटी खास आहे. कारण ग्रामीण भागातील महिला आत्मनिर्भर बनाव्यात, त्यांची स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक उन्नती व्हावी, या उद्देशाने बँक ऑफ इंडियाच्यावतीने स्टार ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या (ठडएढख) वतीने मातृभाषेतून व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जाते. या आर सेटीमधून प्रशिक्षण घेऊन कित्येक महिलांनी त्यांचे स्वप्न पूर्ण केले आहे.

ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था म्हणजेच आर सेटी ही २०१० साली स्थापन झाली आहे. देशातील प्रत्येक जिल्ह्यात ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत व त्या जिल्ह्यातील अग्रणी बँकेद्वारे संचलित एक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आली आहे. या अंतर्गत ज्यांचे वय वर्ष १८ ते ४५ आहे आणि ज्यांना मातृभाषेचे ज्ञान आहे, अशा ग्रामीण भागातील व्यक्तिंना प्रायोजित प्रशिक्षण दिले जाते. संस्थेमधून दिली जाणारी प्रशिक्षणे ही निवासी व मोफत स्वरूपाची असतात. प्रशिक्षणा दरम्यान चहा, नाष्टा, जेवण, निवासाची सोय, प्रात्यक्षिकसाठी लागणारे सर्व साहित्य हे सर्व मोफत पुरवले जाते.

प्रशिक्षणार्थींची निवड करताना प्रथम संस्थेकडील प्रशिक्षण अभ्यासक्रमांची जनजागृती करुन प्रशिक्षणार्थींची निवड मुलखतीद्वारे केली जाते. यासाठी प्रशिक्षणार्थींना आवश्यक कागदपत्रके, दाखले, आधार कार्ड, रेशन कार्ड, जन्म तारखेचा कागदोपत्री पुरावा, २ पासपोर्ट साईज फोटो, दारिद्र्यरेषेखाली असल्यास त्याचा कागदोपत्री पुरावा इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागतात.

अशा प्रकारच्या व्यवसायाभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमामधून प्रशिक्षण घेऊन महिला आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. या संस्थेमार्फत दिली जाणारी प्रशिक्षणे ही उद्योग व व्यवसाय उभारणीसाठी अल्पकालीन प्रशिक्षण व दीर्घकालिन स्वावलंबन असतात.

संस्थेमध्ये महिला वर्गासाठी काही विशेष प्रशिक्षणे आहेत. कुक्कुटपालन, खेळणी बनवणे, अगरबत्ती तयार करणे, फास्ट फूड उद्यमी, महिलांसाठी वस्त्रलंकार रचना, पापड लोणचे मसाला पावडर तयार करणे, कागदी पिशव्या लखोटे व फाईल तयार करणे, मधमाशी पालन, कॉस्च्युम ज्वेलरी उद्यमी, जूट बॅग उद्यमी, बांबू हस्तकलाकुसर, ब्युटीपार्लर मॅनेजमेंट, रेशीम कोश उत्पादन, दुग्धव्ययसाय गांडूळ शेती, भाजीपाला रोपवाटिका शेती, व्यायसायिक फूलशेती इत्यादी प्रशिक्षणे संस्थेमध्ये उपलब्ध आहेत. या प्रशिक्षणामध्ये काही प्रशिक्षणे ही १० दिवसांची तर काही प्रशिक्षणे ३० दिवसांची तसेच अल्पकालिन प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध आहेत.

या प्रशिक्षण कार्यक्रमातून परिपूर्ण व्यावसायिक ज्ञान व प्रात्यक्षिके, बाजारपेठ निरीक्षण व व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, विविध खेळ व उपक्रमांच्या माध्यमातून आत्मविश्वासामध्ये वाढ, विविध शासकीय योजना व प्रकल्प अहवालविषयक माहिती दिली जाते. तसेच प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वतःचा व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज मिळवण्यासाठी मदत केली जाते.

प्रशिक्षण संस्था स्थापन झाल्यापासून सप्टेंबर २०२३ अखेर २४४ प्रशिक्षण कार्यक्रम घेतले असून त्यातून ६ हजार, ८५४ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये ५ हजार ७९९ इतक्या महिला आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमातून ५ हजार, १०६ इतकी स्वयंरोजगार निर्मिती झाली असून यामध्ये महिलांचा समावेश ४ हजार, २९१ इतका आहे.

ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत व बँक ऑफ इंडिया सांगली संचलित स्टार ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेचे (ठडएढख) हे प्रशिक्षण केंद्र, डॉ. बापुजी साळुंखे महाविद्यालयच्या पाठीमागे, रमा उद्यान शेजारी मिरज, (०२३३-२९९००३७) येथे कार्यरत आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ठडएढख संस्थेस भेट द्यावी. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयोग यशस्वी होत आहेत.

**संकलन** जिल्हा माहिती कार्यालय,सांगली

### पुणे शहरातील वाहतुक सुविधा

वेळेत मिळकत कर भरावा यासाठी प्रोत्साहन म्हणून १ कोटी रुपयांची ४५ बक्षिसे देण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत ६ लाख ६० हजार ७८५ मिळकतधारकांनी मुदतीत कर भरला. त्यामुळे मिळकतकर संकलनात गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत ३०० कोटींपेक्षा अधिकची वाढ झाली आहे. यामुळे महापालिकेमार्फत नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देता येतील. इतरही महानगरपालिकांनी अशा स्वरूपाचा उपक्रम राबवावा, असे आवाहन त्यांनी केले.प्रास्ताविकात आयुक्त विक्रम कुमार यांनी लॉटरी उपक्रमाची माहिती दिली. मिळकतकरातून येणारी रक्कम शहराच्या विकासासाठी उपयोगात आणली जाते. वेळेवर कर भरणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविल्याने यावर्षी मिळकतकरात गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत वाढ झाली आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत पुणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीतून घनकचरा व्यवस्थापनासाठी खरेदी केलेल्या १० विद्युत वाहनांचे लोकार्पण करण्यात आले. या वाहनांची किंमत सुमारे १ कोटी ७२ लाख असून एका फेरीत १.५ ते २ टन कचऱ्याची वाहतूक होणार आहे.

### हा हिंदूच देश, हिंदुनीच


आहेत. त्यांना काय करायचं ते स्पष्ट होतं, काय करायचं हे माहीत होतं. हा त्यांचा गुण होता. लोकांचं दुःख त्यांना बघवलं गेलं नाही, लोकांची दयनीय अवस्था, महिला सुरक्षित नाहीत. महिलांची दुर्दशा पाहून शोक त्यांचा मनात होता, असं सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

सरसंघचालक मोहन भागवत बोलताना म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या काळात आई -वडील संस्कार द्यायचे. मात्र,आजकाल आई वडील हे मोबाईलमध्ये असतात. वडीलांकडून मिळालेलं बाळकडू यामुळे विचार स्पष्ट होतो. हा हिंदूच देश आहे. हिंदू म्हणजे, मुस्लिम लोकांचा सांभाळ केला. हे भारतच करू शकतो. युक्रेन लढाई, हमास युद्ध आपल्या काळात अशी लढाई झालेली नाही. आपण भांडत नाही म्हणून आपण हिंदू आहे, असा देश असला पाहिले, ज्यात आई सुरक्षित असेल. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर राजा बनण्याची वेळ आली. तेव्हा प्रजेच्या संरक्षणासाठी राजा झाले. आपण एकटे असलो तरी असुरक्षित आहोत. आपल्याला माणसं राखता आली पाहिजेत. तेव्हा आपण सुरक्षित असतो, असंही मोहन भागवत म्हणाले आहेत.

शिवाजी महाराज पुण्यात आल्यावर कसबा गणपती शोधून काढला आणि शेती करायला सुरुवात केली. लोकांना वसवलं. तरुण मित्र जमा केले, त्यांचाकडे असलेली कला निरखून लोक प्रेमानं जोडले. मित्रांचे दोष प्रेमानं दूर केले, संकटात मदत करत मैत्री केली, असंही सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

तेलंगणाचा कुतुबशाह शिवाजी महाराजांना घाबरला होता. शिवाजी महाराज यांचे विदेशी मुसलमानांशी भांडण होतं. भारतात राहणाऱ्या मुसलमानांशी वैर नव्हतं. शिवाजी महाराजांनी एक-एक माणूस उभा केला होता. शुद्ध चरित्र संपन्न माणसं शिवाजी महाराज यांनी उभं केलं, त्यामुळे त्यांनी उभे केलेले राज्य लोकशाहीचे राहिले, असंही सरसंघचालक म्हणाले. तसेच, अफजल खान लोकांना त्रास देत असताना धैर्य ठेवून योग्य वेळेची वाट पाहिली. अफजल खान याला भेटायला जाऊन त्याचा डाव त्याच्यावरचं उलटवणं हे साहस आणि धैर्य बुद्धी चातुर्य महाराजांमध्ये होतं, असंही सरसंघचालक म्हणाले.

## दिव्यांगांनी एकापेक्षा अधिक कौशल्ये आत्मसात करावी : राज्यपाल रमेश बैस



मुंबई : कृत्रिम प्रज्ञा व मशीन लर्निंगच्या आजच्या काळात रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होत आहेत. परंतु, त्यासोबतच अनेक कौशल्ये कालबाह्य ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर दिव्यांग पुरुष व महिलांनी एकापेक्षा अधिक कौशल्ये आत्मसात करावी; स्वतःकडे असलेली कौशल्ये उन्नत करावी तसेच पारंपरिक कौशल्ये जोपासावी, अशी सूचना राज्यपाल रमेश बैस यांनी केली.

राज्यपाल श्री. बैस यांनी आज वरळी मुंबई येथील नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब) या संस्थेला भेट देऊन दृष्टिबाधित महिलांना 'स्वयंरोजगार किट'चे वाटप केले, त्यावेळी ते बोलत होते.

जगातील काही देशांमध्ये युद्धजन्य परिस्थिती आहे. त्याचा जगाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. आयटी क्षेत्रासह इतर क्षेत्रामध्ये नोकऱ्या असुरक्षित आहेत. अश्यावेळी बहुकौशल्यामुळे दिव्यांगांना विपरीत परिस्थितीवर मात करता येईल, असे राज्यपालांनी सांगितले.

स्थापनेपासून गेल्या ७१ वर्षांमध्ये 'नॅब' संस्थेतर्फे दिव्यांग व्यक्तींच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगारासाठी चांगले काम केले जात असल्याबद्दल राज्यपालांनी संस्थेचे अभिनंदन केले. 'नॅब'च्या समस्यांबाबत आपण संबंधित मंत्र्यांकडे पाठपुरावा करु, असे राज्यपालांनी सांगितले.ऑडिओ पुस्तकांची मागणी केवळ दिव्यांगांकडूनच नाही तर सर्वसामान्यांकडून देखील वाढत आहेत. त्यामुळे 'नॅब'ने आपली ऑडिओ लायब्ररी अद्ययावत ठेवावी, अशी सूचना राज्यपालांनी केली. दिव्यांगांना सहानुभूती नको तर सहकार्य व सन्मान हवा असे राज्यपालांनी सांगितले.ाज्यपालांच्या हस्ते 'नॅब'ला योगदान देणाऱ्या दानशूर व सेवाभावी व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. सुरुवातीला राज्यपालांनी संस्थेच्या ब्रेल तसेच ऑडिओ बुक विभागांना भेट देऊन पाहणी केली. नॅब'चे अध्यक्ष हेमंत टकले यांनी नॅबच्या कार्याची माहिती दिली तसेच दिव्यांगांसाठी बरेच कार्य होणे गरजेचे असल्याचे सांगितले. संस्थेचे मानद सचिव डॉ. विमलकुमार डेंगला यांनी नॅब संस्थेत ब्रेल पुस्तकांच्या निर्मितीचे देशात सर्वात मोठे काम चालत असल्याचे सांगितले.

'नॅब'तर्फे अंधेरी मुंबई येथे दिव्यांग महिला व विद्यार्थीनींसाठी वसतिगृह चालविले जात असून सदर वसतिगृहाची इमारत तसेच 'नॅब'च्या इमारतीची पुनर्बांधणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येकी १००० रुपये किमतीच्या स्वयंरोजगार किट देऊन दृष्टिबाधित महिलांना संस्थेतर्फे आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले.नॅबच्या कार्यकारी संचालक पल्लवी कदम यांनी प्रास्ताविक केले तर दिव्यांग मुलामुलींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. मानद सचिव हरेंद्रकुमार मलिक यांनी आभार मानले.

## पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शहीद पोलिसांना अभिवादन



मुंबई : देशभरात कर्तव्य बजावताना धारातीर्थी पडलेल्या पोलीस दलातील अधिकारी, जवानांना स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नायगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या हुतात्मा मैदानावरील स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

नायगाव येथील पोलीस मुख्यालयाच्या हुतात्मा मैदानावर आयोजित कार्यक्रमाला आमदार सदा सरवणकर, पोलीस महासंचालक रजनीश शेठ, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी, शहिदांचे नातेवाईक उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी देशभरात गेल्या वर्षभरात शहीद झालेल्या १५ पोलीस अधिकारी, १७३ पोलीस जवानांच्या माहितीच्या संदेशाचे वाचन करून श्रद्धांजली अर्पण केली. मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शहिदांच्या नातेवाईकांची भेट घेवून सांत्वन केले.यावेळी पोलीस महासंचालक श्री. शेठ, आयुक्त श्री. फणसळकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, प्रमुख अतिथी यांनीही शहिदांच्या स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. शहिदांना अभिवादन करण्यासाठी पोलीस दलातर्फे हवेत तीन वेळा बंदुकीच्या फैरी झाडण्यात आल्या. यावेळी विशेष पोलीस कवायतीचे संचलन पोलीस उपायुक्त श्रीमती तेजस्वी सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन सहायक पोलीस निरीक्षक राजेश खोपकर, संतोष कालापहाड यांनी केले.

## कुष्ठरोग्यांना तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करावे : आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार



मुंबई : राज्यात घरोघरी सर्वेक्षण करून, कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रीय क्षयरोग शोध मोहीम काटेकोरपणे राबवावी. शोध मोहीमेदरम्यान नागरिकांचे या आजाराबाबतचे गैरसमज दूर करावे. नागरिकांना हा आजार बरा होण्याचा विश्वास देवून तपासणी व उपचारासाठी प्रवृत्त करावे, असे राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार यांनी सांगितले.राज्यात २० नोव्हेंबर ते ०६ डिसेंबर २०२३ या कालावधीत आरोग्य विभागाच्या वतीने, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कुष्ठरुग्ण शोध अभियान व सक्रीय क्षयरोग शोध मोहीम राबविण्यात येत आहे. याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. सामाजिक कारणाने कुष्ठरोग लपवण्याकडे लोकांचा, विशेषतः महिलांचा कल असल्याचे सांगत आयुक्त श्री. कुमार म्हणाले की, आरोग्य विभागाने सोशल मिडिया, सामाजिक संस्था व इतर माध्यमाद्वारे लोकांचे प्रबोधन करून, योग्य उपचाराने हा आजार बरा होतो असा विश्वास निर्माण करावा. अधिकाधिक संशयित रुग्णांची तपासणी करावी. या मोहिमेसाठी स्थानिक जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन घ्यावे, अशा सूचनाही आयुक्तांनी यावेळी दिल्या. पंतप्रधान व राज्याचे आरोग्य मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय गाठण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## कडवान गावात बाल विवाह मुक्त भारत कार्यक्रम संपन्न



नवापूर/प्रतिनिधीः कैलास सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशन, नवी दिल्ली व हवाई सामाजिक बहुद्देशीय संस्था जुनी सावरट ता. नवापूर जि. नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने लहान कडवान गावात बाल विवाह मुक्त भारत कार्यक्रम घेण्यात आले असून, यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा दर्शना वसावे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती दिली व शाळेचे मुख्याध्यापक मंगलदास पाडवी यांनी विद्यार्थांना बालविवाह होऊ नये म्हणून आपली कर्तव्य व जबाबदारी याबाबत माहिती सांगितली .

तर उपशिक्षक यशवंत वसावे यांनी विद्यार्थासोबत बाल विवाह मुक्त भारत विद्यार्थी प्रतिज्ञा घेतली.

यावेळी हवाई सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा दर्शना वसावे, मुख्याध्यापक मंगलदास पाडवी ,उपशिक्षक यशवंत वसावे, उपशिक्षिका मंजुळा कोकणी ग्रामपंचायत सदस्या वर्षा गावित, निर्मला गावित , मोगरा गावित उपस्थित होते.

## किणी येथे दसरा यात्रा महोत्सव निमित्य जय भारत माता सेवा समिती वतीने विविध धार्मिक, सामाजिक, देशभक्ती कार्यक्रम

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील श्रीक्षेत्र श्रीमंतलिंग मल्लिनाथ पत्रीबन देवस्थान किणी येथे दसरा यात्रा महोत्सव निमित्य जय भारत माता सेवा समिती वतीने विविध धार्मिक सामाजिक आणि देशभक्ती कार्यक्रम आयोजित केली आहेत.



जय भारत माता सेवा समिती नवी दिल्ली राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष प.पूज्य श्री ओम हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात दसरा यात्रा महोत्सव कार्यक्रम नेहमी भक्ती भावनेने मोठ्या उत्साहात साजरी केल्या जातात.सर्वत्र शांती समाधान लाभण्यासाठी महाराजाकडून आत्तापर्यंत देशभरात सुमारे साडेपाच हजार शिवलिंगाची स्थापना करून शिवलिंगाची चिंरतर प्रसाद सर्वा समोर ठेवली आहे.त्यापैकी किणी येथील श्रीक्षेत्र श्रीमंतलिंग मल्लिनाथ पत्रीबन देवस्थान हे नवसाला पावणारा स्वयं जागृत देवस्थान आहे. प्रत्येक दसरा यात्रेस तुळजापूर, उमरगा, आंळद व अक्कलकोट तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात.यामुळे यंदा यात्रा कमिटीचे वतीने दसरा यात्रेची जयत्त तयारी करण्यात येत आहे.

सोमवार दि.२३ रोजी दिवसभरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून संध्याकाळी किणी गावातून श्रीचे पालखी व कुंभ मिरवणूक कार्यक्रम होणार असून संध्याकाळी ७ वाजता होमहवन, मंगलाष्टकं, महाआरती, महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. रात्रभर भजन,भारुड,गी गी पदा आदी भरगच्च धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेल्या आहेत. मंगळवार दि. २४ रोजी पहाटे श्री चे महापूजा,म्हारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून यानंतर सदगुरु श्री ओम हवा मल्लिनाथ महाराज दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भाविक भक्तांनी सद्गुरूचा दर्शन आणि महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावी असे आवाहन एका पत्रकाद्वारे यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## नळदुर्ग येथे राजपुत समाज बांधवासाठी सभागृह व संरक्षक भिंतीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथील माऊली नगर मधील लोकमान्य हाऊसिंग सोसायटीच्या ओपन स्पेस मधील शिल्लक असलेल्या जागेत राजपुत समाज बांधवांसाठी सभागृह व वॉल कंपाउंडचे



बांधकाम करून द्यावे अशी मागणी नळदुर्ग शहर राजपुत समाज मंडळाने तुळजापूर चे लोकप्रीय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना दिलेल्या निवेदनाद्वारे साकडे घातले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग येथील माऊली नगर मधील लोकमान्य हाऊसिंग सोसायटीमध्ये गेल्या ३० वर्षांपासुन राजपुत समाज राहत आहे. या हाऊसिंग सोसायटीच्या ओपन प्लेस मध्ये जी शिल्लक जागा आहे त्या जागेवर राजपुत समाजासाठी सभागृह तसेच वॉल कंपाउंडचे बांधकाम करून द्यावे. या जागेची नोंद नगरपालिकेच्या दप्तरी असुन त्यामुळे याठिकाणी बांधकाम करण्यासाठी कुठलीच अडचण येणार नाही. सभागृह हे जनहितार्थ असल्यामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरीकांना याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे आपण या कामासाठी लागणारा निधी उपलब्ध करून द्यावे अशीही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर शहर राजपुत समाजाचे अध्यक्ष सुधीरसिंग भैया हजारी, उपाध्यक्ष अजयसिंह चंदेले, सरदारसिंग ठाकुर, सचिव मंगेशसिंह चंदेले, सुरेश हजारे,राहुल हजारे, अजित हजारे, मनोज हजारे,जमन ठाकुर,महेश हजारे, शुभम हजारे,पवन चंदेले,सौरभ गहेरवार,संदीप हजारे, अक्षय हजारे,सागर हजारे,सुजित हजारे,विजय ठाकुर, मंगेश चंदेले,अजय चंदेले,दिलीप ठाकुर,प्रताप, हजारे अतुल हजारे व दिनेश हजारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

तुळजापूर चे लोकप्रिय आमदार हे लवकरात लवकर नळदुर्ग येथील राजपूत समाजासाठी त्यांच्या कार्यासाठी सभागृह उपलब्ध करून देतील त्याचबरोबर संरक्षण भिंत या दोन्ही कामासाठी निधी उपलब्ध करून देतील अशी अपेक्षा राजपूत समाज बांधवातुन व्यक्त करण्यात आली आहे .

## उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुभाष जाधव यांना वंचितने दिले निवेदन



उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे : प्रभाग क्रमांक ९ येथील सुभाष नगर परिसरातील गेल्या अनेक वर्षापासून समाजमंदिर अस्तित्त्वात आहे परंतु काही स्थानिक लोकप्रतिनिधी व महानगर पालिका प्रशासन अधिकारी यांच्या मिलिजुळीने याच ठिकाणी गरज नसताना दवाखाना खोलण्याचा घाट घातला आहे त्या विरोधात तेथील महिला वर्ग व शेकडो नागरिक नाराज आहेत.. कारण गोरगरिबांचे सार्वजनिक कार्य त्याच समाजमंदिरात साजरे होत आहेत पण आता हजारो रुपये खर्चून खाजगी हॉल करायला लागेल या चिंतेने नागरिक त्रस्त आहेत म्हणून तेथील महिला वर्गाने वंचित बहुजन आघाडी उल्हासनगर शहर कमिटी कडे सहकार्य करण्याची मागणी केली या विषयाला घेऊन वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी यांनी उल्हासनगर महानगरपालिका प्रशासन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ सुभाष जाधव साहेब यांची भेट घेऊन चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले

## हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशालेत आदर्श शिक्षिका फिरदोस सय्यद यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित, अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे नवरात्रिनिमित्त नारी देशाचा अभिमान, करु या नारी शक्तीचा सन्मान या उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवून, कर्तव्यपूर्ती करून नावलौकिक प्राप्त केलेल्या महिलांचा सन्मान प्रतिदिवशी करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आजरोजी जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, हन्नूर येथील उपक्रम व कृतीशील शिक्षिका सौ. फिरदोस सय्यद यांना तालुका पंचायत समिती शिक्षण विभाग, अक्कलकोट यांच्या वतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त झाल्याने प्रशालेच्या प्रवेश, सहल क्षेत्रभेट विभाग प्रमुख सौ. मृदुलादेवी स्वामी यांच्या हस्ते शाल, हार व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.

व याच जि. प. शाळेच्या दुसऱ्या कर्तव्यदक्ष शिक्षिका सौ. संध्याराणी ओमन यांचाही प्रशालेच्या सांस्कृतिक विभाग सहाय्यिका सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशालेचे पर्यवेक्षक श्री. अशोक साखरे सर यांनी कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु




कदाचन या संस्कृत श्लोकाप्रमाणे आपण आपल्या क्षेत्रात निष्ठेने व प्रामाणिक, निस्वार्थ भावनेने काम करत राहिल्यास फळ आपोआप मिळते व आपल्या चांगल्या कार्याची निश्चितपणे दखल घेतली जाते.हे फिरदोस सय्यद याचे उत्तम उदाहरण आहेत असे त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी प्रशालेचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सरदार मत्तेखाने, सुरेश जाधव, निंगप्पा बिराजदार व समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी केले तर आभार सौ. मृदुलादेवी स्वामी यांनी मानले.

## पांडुरंग महादेव निर्मळे यांच्याकडून जिल्हा परिषद शाळेस पाच हजार रुपयेची मदत

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील पांडुरंग महादेव निर्मळे यांनी कै. महादेव भुजिंग निर्मळे यांच्या स्मरणार्थ आर्थिक मदत केली. दत्तवाड केंद्रा मार्फत होणाऱ्या खेळातील ट्रॉफी, सर्टिफिकेट साठी



ही मदत केली. गावचे रहिवाशी असून सध्या ते मुंबईमध्ये वास्तव्यास आहेत .परंतु त्यांनी आपली जुनी शाळा विसरलेली नाही. शाळेसाठी काहीतरी योगदान करावे अशी त्यांची इच्छा होती. आपली शाळा जिल्हा परिषद शाळा या अनुषंगाने त्यांनी मदत केली. सर्वत्र यांचे कौतुक होत आहे.

## काशीराया काका पाटील शाळेच्या माजी विदयार्थ्यांचे अमूल्य योगदान

### दुष्काळी स्थितीत भरले दहावीच्या सर्व ४५ विद्यार्थ्यांचे २४७५० रुपये परीक्षा फी

अक्कलकोट/प्रतिनिधीः स्वतःच्या शिक्षणाच्या काळात आपल्या कुटुंबाच्या अडचणीच्या काळाने आपली परीक्षा फी व इतर खर्च भागविण्यात अनंत अडचणी येत होत्या. त्यातून मार्ग काढत काशीराया काका पाटील विद्यालय अक्कलकोटच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण जिद्दीने पूर्ण करीत स्वतःच्या हिमतीवर काहींनी नोकऱ्या मिळविल्या तर काहींनी स्वतःचा व्यवसाय सुरु केले. त्यातुन स्वतःला आणि कुटुंबाला देखील सावरले. ते तिथेच थांबता आपल्या समाजातील व प्रशालेतील विदयार्थ्यांना यावर्षीच्या पाऊस नसलेल्या दुष्काळी स्थितीत फी भरण्याचा त्रास होऊ नये यासाठी आपले गणित शिक्षक समीर मनियार सर यांनी केलेले आवाहन सहज पेलेले आणि काही तासातच शाळेतील सर्व ४५ दहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रत्येकी ५५० रुपये प्रमाणे २४७५० रुपयाची मदत गोळा झाली.सध्या अक्कलकोट तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने अक्कलकोट येथील काशिरायाकाका पाटील विद्यालयाचे सहशिक्षक समीर मनियार यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी या हेतूने माजी विद्यार्थ्यांना प्रत्येकी एका विद्यार्थ्याची मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या एसएससी बोर्डाची परीक्षा फी ५५० रुपये भरण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देत काही तासातच प्रशालेतील सर्व ४५





विद्यार्थ्यांची फी जमा झाली. मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे सर्व शिक्षक अक्षरशः भारावून गेले आहेत.सध्या पुण्यामध्ये कार्यरत चार्टर्ड अकाउंटट बाबुराव व्हनकोळ यांनी ११००० रुपये देऊन सिंहाचा वाटा उचलला.सध्या केनिया देशात कार्यरत असलेले रशीद जमादार यांनी २६०० रुपये, नाशिक येथे कार्यरत असलेल्या मनीषा कुलकर्णी यांनी ११०० रुपये, पद्मनाभ कुलकर्णी, अनिरुद्ध पाटील, प्रतिभा वाडे, सैपन मुल्ला, चंद्रकांत खेत्री, लक्ष्मण कुंभार, सोहेल शेख, राजशेखर माशाळे, दत्ता मातोळे, रूकमाजी वाघमारे, महेशकुमार कळवंत, मल्लिनाथ भंगुर्गीकर, सिद्धेश्वर हरवाळकर यांनी प्रत्येकी ५५० रुपये दिले. अक्कलकोट येथील डॉक्टर शहा फाउंडेशनचे चेअरमन विपुल शहा यांनी सुद्धा ११०० रुपये देऊन माजी विद्यार्थ्यांच्या कार्यास हातभार लावला.माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रशालेच्या वतीने इन्चार्ज सौ अश्विनी पाटील व सर्व स्टाफ यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले.



## नूतन नायब तहसीलदार गोपाल तापडिया यांचा सत्कार

कळंब/प्रतिनिधी : कळंब तहसील कार्यालय येथे नायब तहसीलदार म्हणून गोपाल व्यंकटलाल तापडिया रुजू झाले असून दि. १७ ऑक्टोबर २०२३ त्यानी पदभार स्वीकारला, यापूर्वी तापडिया हे धारूर तहसील कार्यालय येथे नायब तहसीलदार व धारूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी म्हणून त्यांच्याकडे चार्ज होता. त्यांचा कळंब तहसील कार्यालय येथे साबेर चाऊस यांनी शाल, श्रीफळ, व पुष्पहार देऊन सत्कार केला.

## बौद्ध वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन.

लातूर : मंगल परिणय ग्रुप लातूरच्या वतीने रविवार दिनांक २९/ १०/ २०२३ रोजी सकाळी ११:००ते ६:०० ह्या कालावधीत ईरण्णा उपलप मंगल कार्यालय, सात रस्ता, मोदीखाना सोलापूर येथे बौद्ध भव्य अशा वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.मेळाव्याचे उद्घाटक म्हणून रिपाइं(आठवले गट) चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त विवाह इच्छुक मुलामुलींनी व त्यांच्या पालकांनी मेळाव्याला उपस्थित राहावे असे आवाहन मंगल परिणय ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अनिल गायकवाड, रमेश जाधव, भैय्यासाहेब कांबळे, मिथुन कांबळे, रमेश माळशिखरे, वसंत गायकवाड, शिवाजी वाघमारे, कृष्णा माने, सचिन तुरबे, चंद्रमणी वाघमारे, माणिक डोलारी, विठ्ठल सोनकांबळे यांनी केले आहे. नोंदणीसाठी अनिल गायकवाड (मो.नं.९६८९९८४२६१) यांच्याकडे संपर्क साधावा.

## नशाबंदी मंडळाचा ६५ वर्धापण दिनानिमित्त व्यसनमुक्तीचे धडे



ठाणे/मिलिंद जाधव : नशाबंदी मंडळाचा ६५ वर्धापण दिनानिमित्त शांतीनगर शिक्षण मंडळ पाथर्ली डोंबिवली पूर्व येथे सामाजिक न्याय विभाग व नशाबंदी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही चालतो व्यसन मुक्ती साठी हा कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी टिळकनगर पोलीस स्टेशनचे पी.एस .आय दत्तात्रय बोराटे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर यावेळी उपस्थित सर्वांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली. अमोल मडामे यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे प्रकार किती आणि व्यसनामुळे शरीराची कशी हानी होते व व्यसन रोखण्यासाठी उपाय कोणते यावर मार्गदर्शन केले. तर आकाश देसले यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गर्शन केले. सदर कार्यक्रमात १२५ विद्यार्थी सहभागी झाले असून शिक्षक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे जिल्हा संघटक रविंद्र गुरचळ यांनी केले. तर सुनील चव्हाण ,समाधान वानखेडे यांचे सहकार्य लाभले. आभार प्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका लता घाडगे यांनी केले.




## आळणी येथे ‘मेरी माटी, मेरा देश, उपक्रम

धाराशिव/प्रतिनिधीः आळणी व्ही.पी कॅम्पस मधील श्री भैरवनाथ निसर्ग मंडळ संचालित औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयात 'मेरी माटी, मेरा देश, या उपक्रमांतर्गत कलश संकलन करून सेल्फी

अपलोड करण्यात आली. या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांनी 'मेरी माटी, मेरा देश, या भारत सरकारच्या उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली, व या कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे डॉ. शेख गाजी, व डॉ. दिनकर झेंडे यांच्या हस्ते अमृत कलश पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्रा. केदार, प्रा. शेरखाने, प्रा. सातपुते, प्रा. थोडसरे, प्रा. माने यांचे सहकार्य लाभले.

## कर्मवीर सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना बॉयलर व अग्नी प्रदीपन संपन्न




पंढरपूर/प्रतिनिधीः कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना चा गळीत हंधगाम सन २०२३ २४ चा बॉयलर अग्नी बॉयलर प्रदीपन प्रदीपन समारंभ संपन्न विद्यमान चेअरमन चेअरमन प्रशांत परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली या श्री शिरीष देशपांडे साहेब पोलीस अधीक्षक सोलापूर अधीक्षक सोलापूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सुरुवातीला मोठ्या मालकाचे मालकाचे प्रतिमापूजन करून करून पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले

सर्व ज्येष्ठ सभासद सभासद शेतकरी सहकारी कामगार या सर्वांच्या सहकार्य मोठ्या मालकाचे आशीर्वादाने यंदाच्या वर्षी हे आपण चांगली गाळप करून उसाला चांगला भाव देऊया असा विश्वास आमदार प्रशांत परिचारक व्यक्त केले कारखान्याची संचालक श्री भास्कर कसगावडे यांनी सह पत्नी सत्यनारायण महापूजा केली

कार्यक्रमासाठी कारखान्याचे व्हाईस चेअरमन व्हाईस चेअरमन कैलास खुळे सर खुळे सर युवा नेते प्रणव परिचारक कारखान्याचे माजी चेअरमन दिनकर मोरे दिनकर मोरे कारखान्याचे कर्तव्यदक्ष कार्यकारी संचालक संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी कुलकर्णी साहेब कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश दादा गायकवाड सर्व आजी-माजी संचालक मंडळ व पत्रकार बंधू खाते प्रमुख बोरगाव परिसरातील प्रतिष्ठित नागरिक कामगार बंधू इत्यादी सर्व उपस्थित होते

## उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडून शहरातील विविध विकास कामांची पाहणी

पुणे : पुणे शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांमध्ये पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम साधत शहराच्या वैभवात भर घालणारे काम करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शहरातील विविध विकासकामांच्या पाहणी दौऱ्याचेवेळी दिले.

यावेळी आमदार सुनील टिंगरे, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, महामेट्रो रेल कॉर्पोशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डीकर, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, रवींद्र बिनवडे, विकास ढाकणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता बाप्पा बहिर, पुणे महानगरपालिकेचे आरोग्य प्रमुख डॉ. भगवान पवार, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठता डॉ. शिल्पा प्रतिनिधी आदी उपस्थित होते.विकास कामांची पाहणी करतांना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाबाबत माहिती घेतली. सार्वजनिक विकासकामे करतांना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल, याकडे लक्ष द्यावे. विकास कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. कामांमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना आवश्यक ते सहकार्य केले जाईल. विकासकामांसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पवार यांनी केले.



मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाअंतर्गत बंड गार्डन परिसरात नदीचे कामे करताना भविष्यातील पूरपरिस्थितीचा विचार करावा. अशी परिस्थिती उद्भवल्यास पाण्याचा प्रवाह अधिकाधिक वेगाने झाला पाहिजे. पायऱ्यावरील दगडात अंतर राहणार नाही, याकडे लक्ष द्यावे. या परिसरात विविध जातीची झाडे लावावी. नागरिकांच्या माहितीसाठी त्यांची नावे इंग्रजीसह मराठीत लिहावीत. ज्येष्ठ नागरिकांना सुलभ सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात यावा. लहान मुलांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने विचार करण्यात करण्यात यावा, अशा सूचना श्री. पवार यांनी दिल्या. खराडी येथील ऑक्सिजन पार्कची पाहणी केल्यानंतर श्री. पवार म्हणाले, अधिकाधिक ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड करा. विविधरंगी गवताची लागवड करावी. प्रेक्षक गॅलरीत सुटसुटीत बैठक व्यवस्था करावी. येथील नागरिकांच्या मागणीचा विचार करता परिसरात योगासनांसाठी जागा निश्चित करुन त्याठिकाणी लवकरात लवकर छत्र आणि सुलभ शौचालयाची व्यवस्था करा. आरोग्याच्यादृष्टीने पदपथावर पेव्हर ब्लॉक ऐवजी मातीचा वापर करण्याबाबत विचार करावा, अशा सूचना श्री. पवार यांनी दिल्या.भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय येथील सेवा प्रवेश नियमानुसार पदभरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी. येथील परिसरात उभारण्यात येणारे रुग्णालय, प्रशासकीय इमारत, वसतिगृह तसेच त्याअनुषंगाने कामे महानगरपालिकेने गतीने पूर्ण करावीत. आगामी काळात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत अशाच प्रकारचे महाविद्यालय उभारण्याबाबत विचार येत आहे, असेही श्री. पवार म्हणाले. राज्यशासनाच्यावतीने नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत असल्याचेही श्री.पवार यांनी सांगितले. राष्ट्रीय नदी संवर्धन प्रकल्प अंतर्गत खराडी येथील मल:निसारण प्रक्रिया प्रकल्प, स्वारगेट येथील महामेट्रो प्रकल्प विकास कामांची पाहणी करुन कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

## तरुणांची दिशाभूल करण्याचे काम उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केले : आ.सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधीः कंत्राटी भरतीवरून महाराष्ट्रातील लाखो बेरोजगार तरुणांची दिशाभूल करण्याचे काम उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केल्याचे आरोप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. भाजपच्या वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी ए-वन चौक, येथे माफीनामा आंदोलन पुकारण्यात आला. याप्रसंगी आ. कल्याणशेट्टी हे बोलत होते.




पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, कंत्राटी भरतीचे महापाप करणारे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार शरद पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले तसेच मविआने महाराष्ट्राची नाक घासून माफी मागावी असे म्हणाले. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस शशिकांत चव्हाण, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, सहर अध्यक्ष

शिवशरण जोजण, महिला अध्यक्षसुरेखा होळीकट्टी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवानंद पाटील, माजी नगरसेवक महेश हिंडोळे, रमेश कापसे, मिलन कल्याणशेट्टी, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष महिबूब मुल्ला, दुधनी बाजार समितीचे सभापती अप्पू परमशेट्टी, सरपंच चिदानंद उन्नद, अण्णाराव बाराचारी, परमेश्वर यादवाड, प्रदीप पाटील, अक्षय वाडकर, मधुकर चिवरे, अनिल पाटील, दयानंद बमनळ्ळी, सुनील दसले, राजू थंब, संजय बागनगरे, बाळा शिंदे, देविदास गवंडी, राहुल वाडे, दयानंद बिडवे, अतिष पवार, अंकुश चौगुले, सुदर्शन यादव, शंकरराव भांजे, नन्नु कोरबू, सिद्धेश्वर माळी, अण्णाराव बाराचारी, सागर तेली, बबलू कामनुरकर, सागर डिग्गे यांच्यासह सर्व भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, सर्व आघाडी अध्यक्ष, नगरसेवक, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, व कार्यकर्ते उपस्थित होते.


## हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भोंडला कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हिरकणी सखी मंच्याकडून दुर्गा अष्टमी निमित्त न्यासाच्या प्रांगणात अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई भोसले यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी भोंडला कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



भोंडल्यात विविध प्रकारच्या गाण्यांचा समावेश होता. पूर्वीच्या काळी रचलेली ही गाणी त्या काळातील परिस्थितीनुसार रचलेली आहेत. दरम्यान कार्यक्रमाची सुरुवात गणपतीच्या आराधनेने करण्यात आली. यामध्ये 'ऐलमा पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा'. याशिवाय अनेक गाणी यात म्हटंली गेली. दरम्यान श्री स्वामी समर्थ, श्री अन्नपूर्णा माता आणि आई तुळजाभवानीच्या प्रतिमेसह हत्तीच्या मूर्तीचे पूजन न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या मंत्रपठाणाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी प्रमूख पाहुणे म्हणून मल्लम्मा पसारे, डॉ.अशावरी पेडगावकर, लता मोरे, रुपाली शहा, डॉ.पवित्रा मलगोंडा, संगीता राठोड, जया सुरवसे, केतकी नकाते, रुपाली रामदासी, आशा भगरे, प्रीती रणसुभे हे उपस्थित होते.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले, कु.तेजुराजे भोसले, कु. स्वामिनिराजे भोसले, खजिनदार स्मिता कदम, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, संगिता भोसले, उज्वला भोसले, पल्लवी कदम, अंबूताई पवार, पल्लवी नवले, स्वाती निकम, छाया पवार, राजश्री माने, क्रांती वाकडे व सभासद कविता वाकडे, शिला मचाले, साधना मचाले, ज्योती मोरे, सुषमा माने, प्रीती रणसुभे, नीता सूर्यवंशी, शुभांगी घाडगे, सचिता पाटील, सोनाली पाटील, निर्मला साठे, रुपाली पवार, प्रमोदिनी सूर्यवंशी, शोभा पोळ, सुवर्णा घाडगे, तृप्ती बाबर, प्रेरणा पाटील, मीनल शहा, राजश्री कलशेट्टी, सुनंदा अष्टगी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना जास्ती जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहील : आ. सचिन कल्याणशेट्टी



अक्कलकोट/प्रतिनिधी : स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्राच्या चुकीच्या अहवाल शासन स्तरावर गेल्याने अक्कलकोट व दक्षिण सोलापूर दुष्काळच्या यादीतून वगळले गेले असले तरी शेतकऱ्यांनी घाबरण्याची कारण नाही. पुन्हा सर्वे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनीआदेश काढलेला आहे. जास्ती जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहील अशी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी आयोजित पत्रकार परिषदेतबोलत होते. ते शनिवार २१ ऑक्टोबर रोजी अक्कलकोट भाजपा कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार कल्याणशेट्टी बोलत होतेविरोधकांनी सरकार व प्रशासनाला दोशी ठरवत आहे आपल्याला याबाबत राजकारण करायचे नसून सदरील दुष्काळ जाहीर करताना ट्रिगर वन ट्रिगर टू पेजच्या अहवालानुसार पर्जन्यमापक यंत्राच्या अहवालानुसार विविध निकष लावून दुष्काळ जाहीर केला जातो. आपल्या तालुक्यातील यंदाची परिस्थिती वेगळी असून जिथे यंत्र बसविण्यात आले आहे तिथे पाऊस पडली मात्र ज्या मंडळात पाऊस पडलेले नाही त्या ठिकाणचे चुकीचा अहवाल शासन स्तरावर गेल्यामुळे दुष्काळ यादीतून अक्कलकोट व दक्षिण सोलापूरचे नाव वगळण्यात आला आहे. याबाबत विरोधकांनी चुकीच्या माहितीद्वारे उलट सुलट बातम्या बातमीदारांना पुरवून शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरवत आहेत.

शेतकऱ्यांनी अशा भुलतापांना बळी पडू नये एक लोकप्रतिनिधी म्हणून मी तिचे गंभीर दखल घेतली असून जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेऊन सदरील माहिती दिली असून याबाबतपुन्हा सर्वे करून अहवाल सादर करण्याचे सूचना महसूल विभाग व तालुका कृषी कार्यालयांना जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिलेला आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दुष्काळ निधी मिळवून देण्यासाठी माझा प्रयत्न राहील असे आमदार सचिन कल्याणशेट्टी बोलत होते. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते

## स्वामी भक्तीतच समाधानी जीवनाचे राजमार्ग : शिक्षणमंत्री केसरकर

अक्कलकोट/प्रतिनिधीः आपणास देवाने जे दिले आहे त्यात समाधान मानणे यातच जीवनाची धन्यता आहे. त्याकरिता भाविकांनी स्वामीभक्तीत गुंतून स्वामींचे नामस्मरण, मनन, चिंतन करीत राहणे यातच जीवनाचे सौख्य सामावले आहे. स्वामी भक्तीने जीवनाचा अर्थ समजून जीवन सोपे होते, कारण स्वामीभक्तीतच समाधानी जीवनाचे राजमार्ग असल्याचे व आध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात वटवृक्ष देवस्थानचे कार्य खुप महान असल्याचे मनोगत राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने नायब तहसीलदार पवार त्यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना केसरकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मंदिर समितीचे श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, संजय पवार, सचिन हन्नूरे, भिमा मिनगले, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, इत्यादी उपस्थित होते.



# जलसंपदा विभागातील अभियंत्यांचं तांत्रिक कौशल्य आणि गुणवत्तापूर्वक कामे जलसंपदेची खरी ओळख : डॉ. संजय बेलसरे

नाशिक / प्रफुल्ल शेवाळे : नाशिक मेरी येथील अभियंता .पा.कृ.नगरकर सभागृहात सन्मा.डॉ.संजय बेलसरे यांच्या शुभहस्ते आणि सन्मा.लेखक अभियंता विलास शेळके, अभियंता शुक्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मा.लेखक,अभियंता .लक्ष्मीकांत वाघवकर यांच्या सहज आठवलं म्हणून.... या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा दिमाखात संपन्न झाला.याप्रसंगी नाशिक पंचक्रोशीतील तमाम सेवानिवृत्त अभियंतेही आवर्जून उपस्थित होते.भातसानगर, शहापूर, ठाणे, पुणे येथून ही वाघवकर यांच्यावर प्रेम करणारे आप्तस्वकीय उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या आतापर्यंत च्या इतिहासात जलसंपदा विभागात आजवर अनेक अनेक थोर ध्येयवादी अभियंता व्यक्तिमत्व होऊन गेली आहेत.. या विभागात असताना आपलं तांत्रिक कौशल्य आणि बांधिलकी च्या भावनेने त्यांनी अनेक महत्वकांशी कामे पुर्णत्वस नेली आहेत.. त्यांनी केलेली गुणवत्ता पूर्वक कामे आज खऱ्या अर्थाने जलसंपदेची ओळख ठरली आहे.. असे वक्तव्य डॉ. संजय बेलसरे यांनी नाशिक येथील सेवानिवृत्त अभियंता लक्ष्मीकांत वाघवकर यांनी लिहलेल्या सहज सुचलं या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्या च्या निमित्ताने केलं आहे. जलसंपदा विभागाचे पाटबंधारे प्रकल्पावर काम करणाऱ्या अभियंत्यासाठी आणि भविष्यात संबंधित काम करणाऱ्या अभियंत्यांसाठी सदर ग्रंथ एक दिशा दर्शक होऊ शकेल.. उत्कृष्ट अभियंता तोच असतो, ज्याने अभियांत्रिकी तसेच अनुषंगिक कामांना आपली जिद्द, मेहनत, प्रामाणिक तेने आणि तांत्रिक कशल्याने, ते काम पूर्णत्वास नेण्यासाठी आपलं सर्वोत्तम योगदान दिलेलं असतं. मुंबईला पाणी पुरवठा करणारे भातसा धरण त्याच बरोबर गिरणा, पालखेड, संकल्पचित्र विभागात त्यांनी केलेल्या नोकरीं विभागाबरोबरच कनिष्ठ अभियंता संघटना, अभियंता पतसंस्था, शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालय, इंजिनर्स जिमखान, सिंचन व्यवस्थापन आणि मुख्यत्वे म्हणजे पाणी वापर संस्था, पाणी वापर संस्था बाबतचे प्रशिक्षण, जलजागृती आदी कामा विषयांचे संदर्भ या ग्रंथात पाहावयास मिळतात. सदर ग्रंथाचे लेखक अभियंता लक्ष्मीकांत वाघावकर हे आजही आपल्या सेवानिवृत्त नंतर वयाच्या पंच्याहत्तरीत पाणी वापर संस्था सक्षम व्हाव्यात म्हणून सक्रिय असून एक ध्येयासक्त अभियंता, व्याख्याता, कार्यकर्ता, मार्गदर्शक, लेखक म्हणून ते बहुमूल्य योगदान देताना दिसून येतात..

